This PDF you are browsing now is a digitized copy of rare books and manuscripts from the Jnanayogi Dr. Shrikant Jichkar Knowledge Resource Center Library located in Kavikulaguru Kalidas Sanskrit University Ramtek, Maharashtra.

KKSU University (1997- Present) in Ramtek, Maharashtra is an institution dedicated to the advanced learning of Sanskrit.
The University Collection is offered freely to the Community of Scholars with the intent to promote Sanskrit Learning.

Website
https://kksu.co.in/

Digitization was executed by NMM

https://www.namami.gov.in/

Sincerely,

Prof. Shrinivasa Varkhedi
Hon'ble Vice-Chancellor

Dr. Deepak Kapade
Librarian

Digital Uploaded by eGangotri Digital Preservation Trust, New Delhi
https://egangotri.wordpress.com/

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कविकुलगुरु कालिदास संस्कृत
विश्वविद्यालय ग्रंथालय, रामटेक

हस्तलिखित संग्रह

दाखल क्र. ७६ विषय अध्यात्म
नांव- अभ्यास विलास (पुस्तक २)
लेखक/लिपीकार नारायणस्वामी
पृष्ठ ७६
काळ इ.स. १९४९ पूर्ण/अपूर्ण

कविकुलगुरु कालिदास संस्कृत
विश्वविद्यालय ग्रंथालय, रामटेक

हस्तलिखित संग्रह

दाखल क्र. ७७ विषय अध्यात्म
नांव- दे. श्री प्रभापती नी स्तुती
लेखक/लिपीकार
पृष्ठ ३३
काळ पूर्ण/अपूर्ण पूर्ण

कविकुलगुरु कालिदास संस्कृत
विश्वविद्यालय ग्रंथालय, रामटेक

हस्तलिखित संग्रह

दाखल क्र. ७८ विषय पूजाविधी
नांव- श्री प्रत्यंगिरा पूजाकल्प
लेखक/लिपीकार
पृष्ठ १८
काळ पूर्ण/अपूर्ण संपूर्ण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ जयनर्मदा ॥

— अभ्यासचिंतन —

पुस्तक - २

— नारायणस्वामी —

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

॥ जय नर्मदा ॥

पुस्तक १ पृष्ठ २१ वरून पुढें चालू —

नाम स्मरण आणि ज्योतिषशास्त्र — नामस्मरणाच्या ज्योतिषशास्त्रदृष्ट्या मी विचार केलेला आहे. परावाचेनें नाम स्मरण जो आम्ही करूं लागलों व त्यासाठीं मंत्रोपदेश अक्षरांचे रूपकें जप करावा लागतो त्यामुळे शारीरिक आणि मानसिक शक्तींत फरक करावयास आढळून येतो. मंत्रोपदेश अक्षरांचे रूपक जप करावा (प्रत्येक) कुंडलींतील प्रत्येक स्थान बळकट होत जातें. यामुळें परमेश्वर अनुभव येत गेल्यामुळें परमात्म स्थानाची वृद्धि होत आहे असें समजावें. व अमुक रूपक जप करावा हें आपोआप ठरतें. नाम मंत्राच्या अक्षरांचे संस्कृत रूपकाचा कोटि जप झाल्यावर जे परमेश्वर साक्षात्कार व सर्व कामना पूर्ण होतात.

मनांतल्या मनांत नाम स्मरण करण्याचा अखंड अभ्यास होईल त्यावेळीं अखंड नाम स्मरणाचा अनुभव येईल. दुसऱ्याशीं बोलतांनाही मनांत नामाचे स्मरणाचा अनुभव येतो. आगगाडींत बसतांनाही नाम स्मरणाची जागीव होईल. परावाचेंत नाम स्मरणाचा अनुभव येऊं लागल्यानंतर सतत स्फुरण होत असल्यावें अनुभवास येईल. ही कुंडीमा असल्यामुळें सर्व कार्यें सर्व व्यवहारांत याचा अनुभव येऊन यश मिळतो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

फारकाय सत्पुरुषांनीं देह ठेविल्यावर पूर्वीचे अस्थी-
मधून हि नामस्मरण होत असल्यामुळें हेकूं येतें व
हें असम्यक्मनाचीं सूक्ष्म विचारानें राक्ष आहे असें
ध्यानीं घेईजे.

सहस्रनामग्रंथ-

सहस्रनामांत हजार नावें देवाचीं असतात. पैकीं
गुणभूत आणि शक्तिवाचक असतीं देव प्रकारचीं
नावें असतात. "याचि नामानि गौणानि ..." ॥

— नामस्वरूप —

नाम स्मरण हें वाणीनें करून स्वरें ज्ञान व साक्षात्कार
प्राप्त करून घेणारा असें संतसांगतात. त्यांचा आदर
करावा आहे. संत वाङ्मयांत याविषयीं अर्थ असतो-

गणाधीश जो ईश सर्व गुणांचा ॥
मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ॥
नमो शारदा मूळ वाग्वादिनीचा ॥
गमो पंथ जाईन या राघवाचा ॥ १ ॥

वाग्वादिनीचा - प्रज्ञा, परमस्वरूपाचा. या स्वरूपाचें
अवलंबन केलें असतां परब्रह्मास जाता येतें.
राघवाचा जाण्याचा हा प्रकारच मार्ग आहे.

नभासारिखें रूप या राघवाचें ॥
मनीं पाहतां मूळ सूटे अचाटे ॥

मूळ- माया इत्यर्थः ।

गुणस्वरूपी परब्रह्माचा देवयानपंथानें जाण्यास
अभ्यास कसा करावा —

प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥
पुढें वैखरी राम आधीं वदावा ॥
सदा-चार हा थोर सांडूं नये तो ॥
जगीं तोचि तो मानवी धन्य होतो ॥ २ ॥

रामदास

प्रभातकाल हीं ब्रह्मांडाची सुषुप्तिस्थिती आहे. अशा
वेळीं रामाचें स्मरण - ध्यान - करावें. हें मोठ्या
वाणीनें करावें हें सांगतात - पहिल्या श्लोकांत
चार वाणींचा उल्लेख आहे. त्यांपैकीं वैखरी
ही पौराणिक वाणी तीं सोडून हृदयीं राम स्मरण
पुरावा वेळें करावें. वैखरीचा लय क्रमानें परा-
वाचेंत करावा. सत् - सत्स्वरूप, परब्रह्म त्याचा
कडे नेणारा हा अत्यंत असल्यानें प्राचें नित्य स्मरण
करावें. मनोलयाचा अभ्यास हा स्वस्वरूपाकडे
नेणारा असल्यामुळें, या प्रकारचा नित्य अभ्यास
करावा. या पंथानें जाणारा स्वस्वरूपीं लीन होतो.
देहधारी जीवात्म्यें तोच धन्य होय.

सदर्थानें नाम स्मरण करावा प्रकारें करावयास पाहिजे
हें प्रथमच सांगून टाकलें आहे.

संतांनीं नामस्मरणाविषयीं जें सांगितलें आहे त्याचें

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रहस्य — सच्चुसंत्र अणालता — मध्यमा वाचेंत्र ज्ञान
होणार नाहीं. पश्यंती वेळीं वेळ वरे च्या पलीकडील
अवस्थेमध्यें अनुभवास येणाऱ्या गुरुमंत्राची आठवी
अुपासना करणें —

सोई बीज नव गुरुनाम मंत्र ॥
ज्ञानी अुपासीत हरिराज ॥

निवृत्तिनाथ

सार सार दिठोवा नाम तुझे सार ॥
आदि मध्य अंतीं निज बीज ओंकार ॥

ज्ञानदेव.

याबद्दल वसिष्ठ वाक्यांत —
"ओंकारो नाम नामतः ।" या श्रुति वाक्य अनुवाद
आहे. परब्रह्माचें वर्णन करणारा हा कर-
तो येणार नाहीं. तें निःशब्द आहे. त्याभासून प्रथम
ध्वनी किंवा नाद अुत्पन्न झाला. तो प्रणवरूपांत
अुत्पन्न झाला. हें च अनंत नाम होय. याला च नादब्रह्म
व अक्षरी म्हटला आहे. देवमानवांत तो अमानव
पुरुष सरला आहे तो शब्द शब्द रोवटीं ब्रह्म-
रूप देअून जातो. याचें स्मरण कसें करावें किंवा
आपोआप हृदयें हें कळून घ्यावें —

अनंत हें नाम जयांचिनि आलें ॥
त्यांतचि जिरालें जगीं जग

नामदेव.

नाथ महाराजाहि या "अनंत" नामाचा
अुल्लेख करून नामदेवाचमाणें च गुरुपासून हें
जाणून घ्यावें असें सांगतात.

— परमात्मस्वरूप — साक्षात्कार —

सूर्य अुगवल्यावर अंधकाराचा नाश होअून सूर्य
नारायण सर्व पृथ्वी प्रकाशमय करून टाकतो, त्याच
प्रमाणें आत्मस्वरूपाचा चित्सूर्याचा अुदय होतां
च अज्ञान रूपी अंधेर नाहींसा होअून चित्प्रभा
जिकडे तिकडे झांकली जाते. या प्रकाशांत देवयान
पंथाचा वसिष्ठ पांथिकास पुढील मार्ग दाखवावें आक्रम-
ण्यास अुत्साह येतो. हिंमत येते व अुत्साह वाढतो.
अशाचा साक्षात्कार झाल्यावर मुद्रा गुरुकृपा
अशेष नष्ट पुढील मार्ग आक्रमला जातो. साधकें
हें ज्ञान झाल्यावर सर्वस्व व ब्रह्मज्ञान प्राप्त झालें
अशी साधकानें जर भावना समजून करून घेतली
तर तो पुढें दृढ होत रहातो. जाण्याचे अैवजीं
साधकें च या मार्गावर अडकून राहील. याकरितां पुष्कळ
वेळ आक्रमण करावयाचा आहे. एकदा या मार्गा-
वर स्वरूप चित्सूर्य प्रकाशांत आपण आलों आहों
अेवढें च साधकानें लक्षांत घेअून गुरुनिष्ठापूर्वक
दृढ अभ्यास करील तर तो पुढील मार्ग हळूहळू
टप्पा टप्प्यानें आक्रमण करील.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

इन्द्रिय सूक्ष्म कारण व महाकारण या-चार्या देहांच्या साक्षी जो आत्मा त्याचा साक्षात्कार झाला नाहीं होतो त्याचा आत्मा ओवतलेली असा केल्या ब्रह्मांडाच्या साक्षी जो परमात्मा, जाणता ईश्वर झणजान त्याचा साक्षात्कार होतो? —

त्रुटि सत्व प्रकृतीं ॥ पर ब्रह्म असे प्राणि विंदिन ॥ तोचि जगताचा तात ॥ श्रुतिचें मत ईश्वर जो ॥

ब्रह्मांडाची उत्पत्ति, स्थिति, लय, यांचा कारक ईश्वर आहे. व्यक्तीच्या देहाला पिंड किंवा व्यष्टि - ब्रह्मांडाचे - चार देह - १ विराट् २ हिरण्यगर्भ ३ (३) अव्याकृत ४ मूल प्रकृति.

विराट् = चराचर सृष्टी, सप्तपाताळ, सप्तस्वर्गलोक नामरूपात्मक सर्व जग. भगवंतांची अर्जुना ला विराट् रूप दाखविले. ब्रह्मांडरूपी ईश्वराचा हा स्थूल देह आहे. याचा अभिमानी ब्रह्मदेव. कुंडलिनी.

विराट् देह ओंकाराची अकारमात्रा - व जागृत अवस्था

हिरण्यगर्भ - आत्म्याचा सूक्ष्म देहामधीं ईश्वराचा हा लिंगदेह आहे (नांव आहे) व्यक्तीच्या इंद्रियांच्या देवता त्याचा हा देह - चे अवयव. व्यक्तीच्या नेत्रांतील देवता

सूर्य. ईश्वराचा नेत्र चंद्र आहे. याचीं इतर इंद्रियें - चे समजावें. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंधादि विषय सगळे प्रत्यक्ष. पंचमहाभूतें. प्राण हाच वायु, विष्णु हें अंतःकरण, चंद्र - मन, ब्रह्मा - बुद्धि - चैतन्यसूत्र आणि नारायण - चित्त, शंकर - अहंकार असा हा देवतामय अपंचीकृत, हिरण्यगर्भ देह आहे. सत्वगुणी व सर्वांस व्यापून राहणारा असा विष्णु हा या देहाचा अभिमानी - अकारमात्रा व स्वप्नावस्था.

अव्याकृत — पिंडाच्या कारण देहाची या देहाचे सात आहे. परमात्मा अव्यक्त प्रकृतीं प्रति बिंबून त्यासच आपलें रूप समजतो. स्वरूपाचे अज्ञानास कारणीभूत वेस - अव्याकृत देह समजावा. विराट् व हिरण्यगर्भ यांतील देहावेगळे नाहीं प्रमाणें जें आहे तो चहा. हें सर्व मायेचें रूप आहे. येथें काम क्रोधादि असंख्य विकारांचे स्थळीं बीज आहे. हा तमोगुणी झाला. मकार मात्रा व अभिमानी रुद्र, सुषुप्ति अवस्था.

मूलप्रकृति - हा ईश्वराचा महाकारण देह आहे. हें सर्व मायेचें रूप. ब्रह्माचे दिकाणीं प्रथम जें स्फुरण झालें तेच मूलमायेचें अधिष्ठान.

अहं असों —

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

याच्या मार्गे पाहून परमात्मा शिव आहे. ज्याला पुरुष म्हणतात. पण तो आहिच्यापासूनें हि-ज्या वर्ती वर्तितो म्हणून आकृतीरी चटेन्वर. या देहाच्या ठिकाणीं बुद्ध सर्व गुण आहे. अर्क मात्र, ज्ञानस्वरूप, मी ब्रह्म आहे ही जाणीव कळण्या विचारणीं असतो. ब्रह्मांडाची सुभविस्था. याप्रमाणें-

ब्रह्मांडाचे हे-पारी देह सांगितल्यावर साक्षात् काहीचे कृत्यीनें माचे अनुभव कसे आहेत नें आणा पाहू-

निर्गुण-उपासना-विवेचन-

देवयानपंथावरील स्वरूपाचे दर्शनानंतर अभ्यासी पुरुष नवीन जोमानें या प्रकाशमय मार्गाचें-ते जो पंथाचें जेथें अंकाराविचारानें आत्मप्रकाशाचा भास लागतो तेथें सगळ ब्रह्मांडाच्या विराट् स्वरूपाचें दर्शन लागतो होतें. आत्माचें दर्शन झाल्यावर मे मूळ मुळें खरी निर्गुण उपासना सुरु होते. सगुणोपासनेच्या पदिपाक झाल्यावर निर्गुण उपासना होय. प्रथम त्रिगुणाचें चढ्या मुळें ईश्वराचें सगुण प्रतीक ध्यानास घेणें आवश्यक असतें. त्रिगुणोपासनेमध्यें या वेळीं एक अनुसंधान

रूप होणें पाहिजे असतें. अंगुष्ठ मात्र आत्मदर्शन होतीच लागेंच ध्यान करावें. म्हणजे ब्रह्मांडाचे देहांचा क्रमवार साक्षात्कार होतो. बाहेर जसें आकाश आहे तसें आपल्या अंतःकरणांत आकाश आहे. त्याप्रमाणें विचारांचा म्हणतात. पिंडीं तें ब्रह्मांडीं ब्रह्मांडीं तें पिंडीं अशी म्हण आहे. तीसार्थ आहे. आपल्या देहाचे पिंडाचे-दोन भाग मानलेले आहेत. त्यांत आदि व समाप्ति आहेत. आपल्या कंठापासून-(कंठांत विशुद्ध नांवाचें स्थानचक्र-आहे) वरील्या भागास ब्रह्मांड किंवा पिंड मानतात. व वरील्या भागास समष्टि किंवा ब्रह्मांड मानतात. भ्रूमध्यांत अग्नि किंवा आज्ञाचक्र आहे. ला ठिकाणीं मरण जाऊं येऊं लागला, किंवा वेळकाळ स्थिर होऊं लागला. म्हणजे आत्मज्ञानें दर्शन होतें. आत्मज्ञानाचे सूर्य असें उपनिषदांत म्हटलें आहे. हीच ब्रह्मांडाची अकार मात्रा व हाच स्थूल विराट् देह. हाच त्रिसूर्य होय. या सूर्याच्या साक्षात् प्रकाश जोंपर्यंत पाहिला नाहीं. तोंपर्यंत कुंडलनें राहू स्थान आंवळें आहे असें समजावें.

आत्मज्ञान सूर्योदय ॥ नसला व्युत्पत्ति सृष्टि-सी नम होय ॥ प्रकाशेना आत्मतत्व स्वयें ॥ नें स्थान त्रि आंवळें ॥

मेरुस्वामी

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चित्-चंद्र मंडळ

चित्सूर्याचें कडक आणि तरुण लाविणें प्रकाशांत प्रवास करावयाचें असला भक्त शांत झाला असेल तर आपला कस्तूरीचें अंतःकरणांत काकण कुलुन्न होऊन जो कारणार्थ चित्घनमय चंद्राचे शीतल, शांत, न आल्हादक किरणांच्या साजवर वर्षाव करतो. चित्-चंद्राच्या शीतल किरणांमुळें व चंद्रकलेच्या अमृतपानामुळें त्या भक्ताला शांतता मिळते। चित्सूर्य ध्यानाचे योगें चंद्रज्योती प्रकाशाचे असें समर्थ सांगतात -

आतां अग्नीं लक्ष लावीं॥ काय दिसेल तें पाहावीं॥ चंद्रज्योती प्रकाशली॥ विमु वांचिला वक्र कट॥ तेथें हुशारीचें काम॥ अग्नीं लक्ष वाढवूनि नेमें॥ तीर लावून सुगम॥ मागें सारी सुधा दें॥ ते ठायीं मागील दाह शमेल॥ शीतलाई सर्वांगि होईल॥ चंद्राची प्रभा सुढाळी॥ फडफडीत चांदणें॥ रामदास

सूर्य आपल्या किरणासह विलीन पावतां, नंतर रजनीनाथाचें साम्राज्य सुरू होतें. या योगें सूर्य मंडळाचा लय चंद्र मंडळांत होतो व चंद्र मंडळाचे अनेक अनुभव येतात. ही ब्रह्मांडाची आहे व हा ब्रह्मांडाचा सूक्ष्म देह आहे. या अवस्थेंत = वे अकार मात्रा आहे. १

रजोगुणाचे प्रकाशांत वेगें चंद्राचा प्रकाश सर्वत्र असला असला नसो, पारकाचा प्रकाश असतो व तो प्रकाश सूर्य तारका चंद्रादिक जडा ब्रह्मांड मग्न नसतात दिसतात, यामुळें चित्प्रकाशांत हे अनुभव पूर्वपर्वी येत असतात. यांतिपदेपासून चंद्राच्या निरानिराळ्या कला जशा शुक्लपक्षांत वृद्धिंगत होतात तशा येथें ध्यानावस्थेंत त्या वृद्धिंगत होऊन त्यांचें सौंदर्य अनुभवास येत असतें.

विकासिला निर्मळ जैसा चंद्र दिसे॥
जें ब्रह्मांडी असे तेंचि पिंडीं दिसे॥

जनार्दनस्वामी

या अवस्थेंतील नादाच्या पावलें क्षणाचे अनेक प्रकारचे अनुभव साधकास येत असतात. याचा अवधानपूर्वक जागृतीनें हि अनुभव घेऊन पाहावा येतो. उदाहरणार्थ - चंद्रमंडळाशीं ध्यानानें इकडे ठायीं नादाच्या पावलां येऊं लागलें क्षणजे तद्पश्चिमेस वर अंतरांत जाण्याचा, वावरण्याचा, किंवा वसण्याचा प्रसंग आला असतो, अंतरंगांत चंद्राच्या शीतल किरणांचे अमृत असल्यामुळें साधकाला किंवा सिद्धाला नवरसूर्य किरणांची बाधा होत नाहीं (नेहंगस्वामी) हा अनुभवाचा विषय आहे. असे अनेक अनुभव येतात येथून. हें एक उदाहरणादिलें आहे. साधकानें आणखी अनुभव पाहावे. (= लाक्षणारसाचा योग असतो व मुक्तिपासाचा योग होत नाही.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

डोळीयाचा डोळा

आमचा नेत्राची देवता सूर्य आहे. सूर्य हा ब्रह्मांडचक्षु
चा नेत्र आहे. सूर्यमंडळ अवस्थेचा लय पुढें हा
अवस्थेंत केल्यावर चिन्मयसुखाची नवलाई अनु
भोगण्यास सांपडते. अतींद्रिय ज्ञान उत्पन्न होऊं
लागे ज्ञाननेत्र उघडला असें समजावें. ब्रह्मांडा
चा नेत्र जो सूर्य त्याचे ठायीं नित्य चिद्घनमंडळा
चा साक्षात्कार आहे. पिंडब्रह्मांड ऐक्य झालियावर
दृढ केला म्हणजे हाच डोळीयाचा डोळा आहे
असें सत्पुरुष सांगतात—

पुढें हिसेल जें नवलु ॥ ते पाही हंसमेळु ॥
चंद्रकिरण शीतळु ॥ पाहसी तूं मग वसाया
लागे डोळियाचा डोळा पाही ॥ देहातीत वर्म
विदेही ॥ चिन्मयसुखाची नवाई ॥ भोगी
आपुलें कांहीं ॥

श्रीसमर्थ.

सत्पुरुष जेव्हां अनुग्रहाचे अंकुर काढतात तेव्हां
पांतीस लक्ष्याकडे पाहावें म्हणजे अनुग्रहाची
स्फूर्ति करते. ~~अंकुर~~—

नयनेंचि पाहावा नयेन ॥ मनें शोधावें
मन ॥

अशा ओवी दासबोधांत पुष्कळ आहेत.

डोळ्यानें डोळा कसा पाहावा ? मनानें मनास कुठें
शोधावें. हें दृष्टी भ्रमाचा भास साक्षी म्हणोनि सर्वां
चे अनर्थाची असमाप्ति भगवान् दिसेल.

नेत्रासंबंधी आणखी एक विवेचन इहस्थपूर्ण
आहे. आत्मज्ञान सर्वी वाढिताचे दोनदेत विवेक
आणि वैराग्य हे होत. हे दोन्ही-पक्षु स्वच्छ
झाले म्हणजे पदार्थ सहजदिसूं लागतात.
मात्रे ~~[illegible]~~ ~~[illegible]~~ थाकडे दृष्टि ठेवावी. हें नेत्र उघड
णें व देवाचें दर्शन होणें—

विवेक आणि सत्संगती हे ॥ नेत्रद्वय वा
आहे ॥

अर्थ हि वचन आहे। विवेकाला—अनुसंधान
किंवा नाहीं अनुसंधान असें झटलें आहे. सत्संग
ती म्हणजे लक्ष्यार्थ—सत्—सत्य वस्तु व ब्रह्म
मात्रे साक्षिरूप म्हणजे प्रकाश किंवा नाद हे
दोन्ही नेत्र उघडले म्हणजे निर्मलदेव दिसतो
—

उघडुनी निजविवेकाचे अक्ष ॥
देव असाक्ष पाहिले ॥

चंद्रलोक मेरुस्वामी

चंद्रमंडळ हें पितृस्थान आहे. येथें पितरांची वस्ती
आहे. यज्ञादि पुण्यकर्मे, व्रतादि पुण्यकर्मे व इतर दान
धर्मादि पुण्यकर्मे. या योगें हा लोकप्राप्त होतो व पुण्यक्षया-

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नंतर सुषुप्ति होते

तीये सुषुप्ते सर्वस्यैके वैत्ति ॥

या श्लोकाच्ये पुढें फक्त ज्ञानी लोक असावें असा अर्थ काढीत आहेत.

— अग्निमंडळ —

चंद्रमंडळाचे ठायीं प्रकाशानंतर देवयानपथावर आधेक अजे डाव्यें व तेजस्वी असें अग्निमंडळ लागतें. ह्याला वह्नेचें मंडळाच्या ठायीं अग्निमंडळ नांव होत असतो. ही ब्रह्मांडाची कार आहे. ही सुषुप्ति अवस्था आहे. ह्यांत मेंदें आनंदाचा भोग मिळतो. हा ब्रह्मांडाचा कारण देह आहे. याला अव्याकृत असें म्हणतात. येथें विकृति नसते. एकच सर्व पाहावयास मिळतें. या अवस्थेंतहि अनेक अनुभव येतात. येथें भागीरथ असतो. यांत चंद्र व तारका दिसणार नाहींत. सर्वत्र एकच व्यापक प्रकाश दिसतो.

चंद्रसूर्य रश्मी न देखो तारांगणें

अवघा हरि होणे हें चि घेवो ॥

निवृत्तिनाथ

— ध्रुवमंडळ - मूलप्रकृति —

ब्रह्मांडाच्या तिसऱ्या देहाचा - अव्याकृत देहाचा लय - लाचे महाकारण देहांत होतो. सुषुप्ति नंतर ह्यांचा उद्भव होतो. अग्निमंडळ प्रकाशावर सतत

धारणा केल्यानें या तेजो पदार्थें अनुलोम विलोम गांठतीं येतें. याखालीं निवृत्ति असंत एकाग्र ज्ञानवास भासिजे हें स्थान सूक्ष्म आहे. याची गती सहस्रदल मंडळापर्यंत होऊं लागली असतां येथें दर्शन होतें. हें सूक्ष्म द्वार आहे. याची प्रतीति असंत सूक्ष्म रूपांत येते. नाथ महाराज यांचें वर्णन करतात -

तया वरी वर्तुळ बिंब ज्योती ॥ श्रोती अन्यथा न मानावें चित्तीं ॥ सरळ रवमय तेजरिती ॥

तया अंतरवृत्ती पीत भासे ॥ नील तु नील अभ्रस ॥ देवसाक्षी शुक्र केवळ ॥ तयाहूनि अर्धनिर्मळ ॥ सूक्ष्म ब्रह्मज्योती ॥ चक्षुचियो दशांशभागी ॥ तेथें पाहती जे योगी ॥ स्वयंतेज निजांगीं ॥ स्वतेजें असे ॥

एकनाथ

तेथें निद्रा नाहीं सुषुप्ति ॥ चंद्रसूर्य भावकले ॥

नामदेव

हें अखंड सूक्ष्मतेज "अणोरणीयान" ॥ अव्याकृत - मायेचें स्वरूप आहे. ह्यांत मात्रा भूतप्रकृति म्हणतात या भूतप्रकृतीपासून मूलवायूचें प्रथम स्फुरण झालें. अनुलोम झालें. विकार येथून व्यक्त सुरू झाले. हाच सृष्टिनिर्माणाचा आरंभ आहे. —

दृष्टीचे प्रमाण चक्षुमाजी ॥ तारकिता तिन्ही प्रमाण

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चक्षु माझी ॥ तेथूनि सृष्टि विस्तारे सतेजी ॥
भाव काशे संपूर्ण ॥

मेरुस्वामी

हें सहस्रकांतीत सहस्रदल कमलांत शोभायमान असें बिंदुरूप द्वार आहे. या पिंडींचें ब्रह्मांडें अंकुरूप ब्रह्माचा सागरांत लीन होतां येतें.

सहस्रदल बिंदु त्यांत तेज असे ॥
हें तो काय सांगा मज ॥

ज्ञानेश्वर

ही तुरीया अवस्था असल्यामुळें स्फुरणरूप आहे. परब्रह्म पासून मूळ स्फुरण किंवा ध्वनि उत्पन्न झाली ती ही च आहे. पिंडाच्या तुरीये चें वर्णन आणि ब्रह्मांडाचें मार्गें आलें च आहे. ही या तुरीये ची हि तुरीया आहे पिंडाची तुरीया - वाणी देहाच्या साक्षी जो आत्मा (देहाचिक, साक्षी) त्याचें दर्शन करून देणे, या शीं ही तुरीया ब्रह्मांडाचे - वाणी देहातीत प्रकाशरूप जो परमात्मा त्याचें दर्शन करून देणे - साक्षात्कार करून देणे -

ते माझी निजात्म - धर्मी ॥ तुमचे तुर्ये - चे ठायीं
तुर्यी ॥ आत्म प्रतीती - ज्या सूर्यी ॥ प्रकाशी
ते जिये नें ॥

मेरुस्वामी

आकाशांत ध्रुव अढळ असतो. त्याचे ठायीं सर्व तारकांचा किरणांचा सर्व प्रकाशमय तारकांना

शांति आहे. या मार्गें ध्रुवास गाठणें असतां - शेवटीं पंचमकाळीं - ध्रुवाचा फक्त तीन होतो. त्या योगें या ठिकाणीं अर्थात देहीं असतां बिंदुस्वरूपाच्या त्या प्रकाशरूप परमात्म्यांत होतो. हृदयांत वास ध्रुवपद असें नाव त्यास आहे. वास ध्रुव दिनब्रह्म असें समर्थांनीं सोलीव सुरेखांत सांगितलें आहे -

तया भाग्यभागीं सज्जन ॥ अढळपद दैवी प्रमाण ॥ ध्रुवदिन ब्रह्म जाण ॥ ध्रुव वैसला अढळते ॥

रामदास

परब्रह्म एकाकी होते. दुसरें कांही नव्हतें. त्यापासून प्रथम मूळ ध्वनी उत्पन्न झाला. जो नाद उत्पन्न झाला तो ओंकारस्वरूपी होता. नाद हें मूळ स्फुरण होय. याला नादब्रह्म असें म्हणतात. आत्मा स्वरूपिणी देह नसल्यामुळें अभावनपुरुष असें अनुभावपदांत सांगितलें आहे. "मी ऽ हें" वृत्ति हें मूळ प्रकृतीचें च स्वरूप आहे. या विषयीं पुढें लिहिलें आहे. मार्गें अनुहत ध्वनी चें वर्णन केलें आहे. या मी की शेवटचा ध्वनी तें च या मूळ प्रकृतीचें स्वरूप होय. नादाचा लय जसा आकाशांत होतो तसा शीं ओंकाराचा क्रम शेवटीं परब्रह्मांत स्वस्वरूपांत - गगन स्वरूपांत होतो.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

पिंड ब्रह्मांड ऐक्य -

देवयान पंथाचें अनुसंधान करून गोठल्यावर पुढें परास्त प्रांत आक्रमण करावयाचा असतो. या पुढें मात्र साध्यकास आणि आनंदाच्या प्रांतांत प्रवेश मिळतो - या आनंदाला मुख्य अनेक नाव आहेत. जडजीवांचे ठायीं शतपट मनुष्याचा आनंद, मनुष्यानंदाच्या शतपट गंधर्वानंद, गंधर्वानंदाचे शतपट देवांचा आनंद आहे. याचें पलिकडे आमदीनें तोपटीं ब्रह्मानंद आहे. आणखी आनंद सावधिक आहे परब्रह्मानंद निरवधिक आहे. प्रकाशरूप परमात्म्याच्या साक्षात्कारानें निरवधि-राखानंद सुखप्राप्ति होणारी आहे. या आनंदाचा यथार्थ वर्णन करणें मुश्कील आहे. असो. पहा

आतां पर्यंतच्या विवेचनावरून लक्षांत येईल कीं पिंडाचे स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण देह आहेत तसेच ब्रह्मांडाचे विराट, हिरण्यगर्भ, अव्याकृत व मूलप्रकृति असे चार देह आहेत. यांचे वर्णनावरून दोहोंचें साम्य लक्षांत येतें. पिंडदेहाप्रमाणें ब्रह्मांडाच्या हि जागृति, स्वप्न, सुषुप्ति व तुरीया या अवस्था असतात व त्यांच्या क्रमवार एकमेकांत असतात होतो हें हि दिसून येईल. पिंडाप्रमाणें ब्रह्मांडाच्या हि मात्रा आहेत व त्या मात्रांचा हि क्रमवार उदय होतो. पिंडाच्या चारी देहांच्या मात्रानुरूप अवस्थांच्या दृष्टीनें व साक्षात्काराच्या दृष्टीनें जसे अनुभव येतात तसेच ब्रह्मांडाच्या अकार, उकार, मकार व

अर्धमात्रा यामध्यें सूर्यमंडळ, चंद्रमंडळ, अग्निमंडळ, व ध्रुवमंडळ यामध्यें अनुभव येतात. शेवटीं पिंडाच्या चारी देहांच्या साक्षी जो आत्मा त्याच्या साक्षात्कार होतो. त्याप्रमाणें ब्रह्मांडाचे चारी देहातील व त्यांच्या पलीकडील जो अकारूप परमात्मा त्याच्या साक्षात्कार होतो. असा वस्तुतः पिंड ब्रह्मांड हें एकच आहे. जे पिंडीं तेंच ब्रह्मांडीं, जें ब्रह्मांडीं तेंच पिंडीं याचा अनुभव याच देहीं करता मिळतो हें वर दाखविलें आहे. हीच गोष्ट साधुसंतांनीं गाइली -

देह ते विदेह महाकारण ब्रह्म ॥
हें निश्चयाचें वर्म ऐसें जाणा ॥ ज्ञानेश्वर

जें ब्रह्मांडीं असे तेचि पिंडीं दिसे ॥
वोळखावयाचा आत्मा पाहीं पुढें ॥
जनार्दनस्वामी ॥

पिंडाच्या साक्षी आत्मा व ब्रह्मांडाचा ईश्वर परमात्मा हा अेकच आहे. पिंडातला आत्मा किंवा जीव व परमात्मा सर्वदा. पिंडातला अंडाकृत व परमात्मा संपूर्ण. तो त्याच्या अंडाकृत असल्यामुळें दोन्ही एकरूपच आहेत. दुसऱ्याचें ज्ञान कमअधिक वर आहे त्याचें विशेषत्व किंवा मेरा वेगळेपणा राहात नाहीं. अुपाधीच्या भेदानें जीवाशिवाचें अैक्य होतें. पिंड ब्रह्मांडाचें हें ऐक्य अैक्य होय. आत्मा व परमात्मा यांचें हि हें अैक्य होय. परमात्मा सर्वव्यापी असून विष्णु. तो सर्वांहि श्रेष्ठ व सर्वांच्या

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

हा शुद्ध परमेश्वर. हा महत् प्रकाशरूप आहे
शून्य महादेव. हा परब्रह्मा-चें रूप असें स्वरूप
आहे शून्य याला ब्रह्म ज्ञानात. याचा हा प्रका-
शरूप परमात्मा-चें ज्ञान सद्भावाचा आपापल्या आंके
सों आला ह्याचा नांवाचें सार्थ असें संबोधन येणें
सगुण उपासने सों आत्मा जसें साधुसंत लोक निरानि-
राळीं नावें देतो त्याप्रमें परमात्मा-चा साक्षात्कार साध
ज्याजे त्याला हि तशाच नांवानें जो संबोधतो

परमात्मा-चें स्वरूप

परमात्म स्वरूप-चें वर्णन सर्व साधुसंतांनीं अलंक
रसभरित, काव्यमय व मोहक व्यवहारानें केलें आहे
देवमान पंथानुसारीत जवळ जवळ दोघटन्या निवारा-
-चें हें स्थल असल्या मुळें प्रत्ये वर्णना करितां साहु-
स्टष्टीत्ये अज्ञानांत स्वैरावे घर साक्षात्कारी पुरुषां
नीं केलें आहे. हें स्थान ज्याजे आनंदाचा सिंधु
हा प्रकाशाचा स्वागर शून्य मात्र प्रकाशरूप
परमात्मा असें ज्ञानात —

नयनीं पाहतां न दिसे विवें ॥
अवघा प्रकाश स्वयंभू ॥
जिकडे पाहे तिकडे अुदयोस्ती दिसे ॥
ऐका अनादिनीं निज प्रकाशे ॥
माझे मीपण देहींच मुराले ॥

प्रपंच देखिले परब्रह्म ॥

एकनाथ

~~परमात्मा-चें प्रकाशा-चें~~

प्रकाशरूप परमात्मा-चें वर्णन सर्व साधुसंतांनीं
पुष्कळ तऱ्हेनें व प्रतिभारूपानें केलें आढळेल
यापैकि ज्ञानेश्वरांनीं फारच विस्तृत व बहारीचें
वर्णन केलें आहे —

ज्योति वेगळा ज्योति वसे ॥
चंद्र सूर्य हेही तेज ने आगळे ॥
अध्यक्ष व्यापिले अनुभवे ॥

दुसरे एकाठिकाणीं पर्यायानें ज्ञानात. हे प्रकुल्ल-
वदन कृष्णा, तुझ्या मुखावर कोटि-चें प्रकाश
प्रकाश विलसित आहे व हा कमलनयन निरानि
राळा आनंदाचा साक्षात असें ज्ञान-च वर्णन आहे —

मुखिये निडळीं कोटि-चंद्र प्रकाशे ॥
कमल नयन हास्य वदन हांसे ॥

आत्मज्ञान-ज्ञानें आपले दृष्टीनें पाहिलें नाहीं
या मनुष्या वरोवर ज्ञान पिसा वर अल्प करूनीं न
अर्थ नाहीं. जे अनुभवी असतात ते-च सर्व जाण-
तात. वर्तमानहि अशा-च-च बोलण्या पाहून
संतोष पावतात असें ज्ञानेश्वर ज्ञानात —

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

नामदेव फार काव्यमय वर्णन करतात —

कोटि सूर्य प्रभा दीसी ॥ गगनीं दाटली अवदीसी ॥ संत नामया सांगती ॥ पैल आला कमळापती ॥

नामदेव

या परमेश्वाचें दर्शन सहस्रदल मंडळांत होतें. अनभांगीं सहस्रदल नांवाचें [illegible] आहे. त्यास ब्रह्मरंध्र किंवा दशमद्वार असें हि म्हणतात. या ठिकाणीं — प्रकाशस्वरूप परमात्म्याचा साक्षात्कार होतो. —

सहस्रदळीं इंदी आत्मा हा कुसरी
नांदे देहाभीतरीं आनंद सदा ॥

मुक्ताबाई

जनाबाईनीं तर स्पष्ट ब्रह्मांत प्रकाशस्वरूप परमात्म्याचें विठ्ठलाचें दर्शन दशमद्वारांत घेतल्याचें काव्यमय वर्णन केलें आहे.

नव [illegible] द्वारातें भेदुनी ॥ दशमद्वारीं गेली जनी ॥ नामा म्हणे जनी पाहे ॥ द्वारीं विठ्ठल उभा आहे ॥

जनाबाई

ब्रह्मरंध्र दिसून येईल कीं, ब्रह्मांडरूपीं सूर्यचंद्रादि मंडळांचें व शेवटीं प्रकाशस्वरूप परमात्म्याचें दर्शन होणें क्रमप्राप्त व साहजिक आहे. साधुसंतांनीं तसे प्रत्यक्ष अनुभव घेतलेले आहेत. म्हणूनच

सर्वजनांचे हिता करितां व अभ्यासी जनांचें [illegible] होऊन लिहून ठेवलेले आहेत. [illegible] स्पष्ट सांगतात कीं — हें सच्चिदानंद परब्रह्म प्राणलिंग प्रत्यक्ष दिसतें. हें जाणणारा पुरुष विरळा. — आणीं अभ्यासी जीव थोडे, तोपर्यंत परमात्म साक्षात्कार करून घेणारा विरळा. पण जो दृढ निश्चयानें अभ्यास करतो त्यास अनुभवाचा साक्षात्कार होतो असें संतांचें म्हणणें आहे —

ते जो शोधी परब्रह्म उभे ॥ धारणें मी समरसें ॥ प्राणलिंग प्रत्यक्ष दिसे ॥ सच्चिदानंद ॥

असेनी सर्वांगीं पाहतां ॥ परमात्मा दिसे [illegible] तत्वता ॥ हे निर्भय कळा ॥ पहिल्या जाणे ॥

एकनाथ

नाथ आणखी एका ठिकाणीं म्हणतात —

परब्रह्म सुखाचा सोहळा ॥ पाहिल्यासे डोळा भरूनी ॥

एकनाथ

सद्गुरुची पूर्ण कृपा पाहिजे, म्हणजे ज्ञान होऊन अवस्थांतर होतो व आरंभप्रथम अपि युक्तप्रथम या योगें आत्मप्रत्यय येतो. एकदां खरा आत्मप्रत्यय आला म्हणजे अनुभव असी वस्तुच राहात नाहीं. तर सहज स्थिति चळत असतां दिसें म्हणजे जन्माच्या कल्पनेचें आत्मस्थिति आहे. ज्ञानी अंतर्दृष्टिच सद्गुरुच्या अगाध महिमा जाणतात —

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

अनुभवेंवीण निजांगें ॥ सहज मनीं नीजांगें ॥
तेह अनुभवी स्वांगें ॥ जननी नुरे ॥

अगाध गुरु दीक्षेची वर्षा ॥ अगाध अनुभवी
वरी वर्षे सूर्य ॥ अगाध चिंतामणीचा सूर्य ॥
अनुदेखासी दृष्टांवरीं ॥ मेरुस्वामी.

परब्रह्माचे सगुणरूप —

प्रकाशरूप परमात्मा - सर्वव्यापी, निराकार,
निरालंब व व गगनस्वरूप असा सर्व ब्रह्माचे - परब्रह्मा
चें सगुणरूप आहे। ब्रह्म रवरा सगुण देव। साधुसंत
सगुणाची उपासना करतात तेच्हां परमात्म्याचा
सर्व आकार पांचा डोळां असाच आपुलें। मा प्रकाशरूपा-
-चीच ते उपासना करतात असें समजावें. ही निर्गु-
णोपासना आहे हें मागें आलेंच आहे. साधुसंतांचे
वचनांमध्यें व्यवहारांत ज्यास आपण सगुण देव म्हण-
तों तो देवाची आकृति वर्णनें जेथें आटतात
त्याच ठिकाणीं निर्गुणोपासना पर होतीं वचनें
आटतात प्राप्त मेले कसा घातावा हें आणीं सम
जेत. साधकांनी तो ध्यान लक्षात कसे लक्ष घेऊन
आत्मकल्याण करून घ्यावें. मा सगुण मूर्ति विषयीं
ज्ञानेश्वर निःसंदिग्धपणें असें सांगतात —

ज्ञानदेव म्हणे सोपानाचे ठायीं ॥
निराकार असे आकारेवरी ॥

ज्ञानेश्वर

आपल्या सुलभतेसाठीं आदिब्रह्मांडाची
उत्पत्ति, स्थिति व लय करणाऱ्या सामर्थ्यवान देवतेची
प्रकाशरूप परमात्म्याची तल्लीन होऊन आनंदसागरांत
मग्न झालेल्या वेळीं वरील उद्गार काढलेले आहेत हें
साधकानें लक्षांत ठेवावें. असा सगुणसाक्षात्कार
आपणांस झाला व इतरांनीं तो करून घ्यावा असें हि
त्यांचें सांगणें आहे. सर्वत्र ज्ञानेश्वर व एकनाथ
यांनीं, अज्ञानी पुरुषांस उपयोगी पडेल असाच
तऱ्हेनें क्रमवार व स्पष्ट काढून अनुभव ग्रंथांत केले
आहेत. साक्षात्कारानंतर मालिकेत अनुभवी पुरुषां-
स मा सर्व वचनांचा अनुभव आलेला असेल च
संप्रदायांतील तऱ्हेवाईक भाव व आग्रह
टाकून करून घ्यावें असें समर्थ सांगतात. ~~समर्थ~~
-ज्यांच वचनाचाहें हीगोष्ट आदर्श आहे. इतर साधु-
संत नव्हे दुसरें काय सांगणार. सर्वांचा अनुभव एक
एकच आहेत. मा वरून सर्वांचे एकच वस्तु तत्त्व
आहे असें ठरलें —

वाचांचा जाणोनी सांडावा ॥ तऱ्हांचा विषयो
नी घ्यावा ॥ साधांचीं भक्ति युक्ति बोलावी ॥ तऱ्हां-
चीं तऱ्हा विवरावी ॥ रामदास

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

[illegible] अशी [illegible] पृथ्वीनें किंवा निर्गुण
अ[illegible] पृथ्वीनें निराकार किंवा घटनाध्यावा
अंगुष्ठमात्र आत्मा हें परब्रह्म सगुणरूप ध्यानमास
पाहिजे. मा आत्मध्यानें ध्यान करावयास पाहिजे. हें
च अंतर्निष्ठ ध्यान होय. ध्यानानें सर्वत्र निर
अंतर्निष्ठ करावयास पाहिजेत. आत्मध्यान करतां
करतां सर्वव्यापी अहा निर्गुण स्वरूपाचा साक्षा-
त्कार होतो —

देव अंतरात्मा सगुण ॥ सगुणें पावे जे
निर्गुण ॥ निर्गुण ज्ञानें विज्ञान ॥ होय अरे ॥

रामदास

आत्मसाक्षात्कार हाच सर्वश्रेष्ठ आहे. तो निर्गुण
-अुपासनेनें प्राप्त होतो. निर्गुण अुपासनेंत ज्यास्त्या
पायऱ्या आहेत व जे जे अनुभव येतात त्यांचें
अंधुक ज्ञान होवयास पाहिजे. नाहीं तर सर्वत्र
भ्रम ॥ सत्यकाचें कसूं नये म्हणून समर्थानीं ज्या
ठिकाणीं अवस्थेचें स्पष्ट वर्णन केलें आहे. मुख्य
ब्रह्म कोणचें. शुद्धस्वरूप कोणचें व मुख्य अुपा-
सना कोणची हें अुघड उघडीत केलें आहे. तें
कळण्यासाठीं ग्रंथ पहा तेहीं ज्यांनीं आणावयास
पाहिजे. पिंडाचे निरासाकरितां आत्मात्म

विचार मुख्य आहे. ब्रह्मांडाचे ठेहीं निरा-
कारावार विचार मुख्य आहे.

ब्रह्मांडाच्या अव्यक्त ब्रह्माच्या अुपासनेत साका-
र विचार करावा असें सांगितलें आहे. प्रार
कोणतें व अप्रार कोणतें हें पाहावें. जें त्रय पावतें
तें असार व जें नाशवंत नाहीं तें सार. आत्मध्यान
त्रय परमात्मांत होतो म्हणून आत्मा ही असार वस्तु
आहे व परमात्मा ही सारवस्तु आहे. तेहीं परमात्मा
वस्तूच्या ग्रहण करावयास पाहिजे म्हणजे परमात्म
ध्यानाच्या साक्षात्कार करून घेतला पाहिजे.
आठवा देह जो मूळमाया म्हणजे निरासानंतर
मुख्य देवजी परमात्मा त्याचा साक्षात्कार होतो.
ध्यानाचे सर्वोत्तम परमेश्वर हृदयीं आहे. त्याचें
च ध्यान करावें व त्याचेच ठिकाणीं अनुसंधान
देवावें —

अखंड ध्यानाचे करावें ॥ सर्वोत्तमाचें ॥
परमेश्वरीं लावावें अनुसंधान ॥ साधितां होइ-
जे पावन ॥ मुख्य ज्ञानेंचि विज्ञान ॥
पावे जेणें ॥

रामदास

परब्रह्माचें ध्यान केलें म्हणजे परब्रह्माशीं ऐक्यता
प्राप्त होईल. जो निर्मळाचें ध्यान करील तो निर्मळ
होईल. कारण जो ज्याची अुपासना करतो तो

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीं

वंदे श्रीं अंजनीसुता ।

(कवि. रा.ब. रघुवीरवर वकील नाशिक)

वृत्त अनुष्टुभ

वंदे श्रीं अंजनीपुत्रा । मारुते । उग्रविक्रमा ।
रामदूता । रामभक्ता । रामदासोत्तमोत्तमा ॥ १
महारुद्रा । महावीर्या । महाबुद्धे । महाबला
महाभागा । महाराक्षे, महोदारा महाचला ॥ २
सूक्ष्मातिसूक्ष्म तू होसी, ओराहानि हि थोर तू ।
घोरां अनंत तू घोर, नभाहुनि मवाड तू ॥ ३
दुर्जना दांडीसी दंडे, सुजना तोषीसी सुखे ।
करिसी जनकल्याण, पीडा नाशीसी कौतुके ॥ ४
चरित्र हनुमंताचे अत्यंताश्चर्यकारक ।
सर्व दुःख निवारिते, सुंदरानंद दायक ॥ ५
जन्मताचि उडिघेई रविबिंब धरावया ।
विहाले देव घाबोनि सूर्य घाबरला तया ॥ ६
म्हणोनि इंद्र वज्राने, हाणी हनुवटीवरी ।
मान सरवावया त्याचा, पडला धरणीवरी ॥ ७
वज्रांग देह तो त्याचा न तुटे न फुटे कधी ।
महाभीम गमे काळा, भयावह भयासही ॥ ८

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जोडोनिया सखा राम, सुग्रीवा राज्य दीधले।
सीताशोध करायासि, समुद्रा तूर्ण लंघिले॥९
हृदयी स्मरोनि श्रीरामा, मुखी देवोनि मुद्रिका।
संकटा वारूनि युक्ती, आला लंकेत तो निका। १०
सूक्ष्मरूपे वधे सर्वां भेटला ला विभीषणा।
देवोनि शोध सीतेचा चालला कपि ला वना॥११
अशोकी जाऊनि सीता सशोका दृष्टि पाहिली
मुद्रिका रामरायाची देवोनी ती सुतोषिली॥१२
आशीर्वाद दिला त्याते चिरंजीवाची हो सदा।
महासिद्धि सुखा दाता, मूल वारिसि आपदा॥१३
भूकमली दिला त्याते, रामासि सुखवावया।
देवोनि मग आनंदे, निघाला परतावया॥१४
मारोनि राक्षसा कांहीं दावोनि श्रीद रावणा।
लंका जाळोनि आला तो भेटावा रघुनंदना। १५
विधुवर्ण विशुद्धाला, विधुदेहा पातला।
सुग्रीव रघुनाथाते, भेटोनि वृत्त बोलिला। १६
राम लक्ष्मण सुग्रीव आणि सर्वहि वानर।
देवोनि अन्नवाटा त्यां, तोषले मनि निर्भर॥
१७

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

समुद्रीं सेतु बांधोनि सर्वही कपि-सैन्य ले।
आले लंकेंत श्रीरामें युद्ध ते घोर मांडिले ॥१८
सौमित्रा संगरि शक्ति लागली म्हणुनी वरें॥
द्रोणाचलास आणोनि हनुमंतें ठेविला बरें ॥१९
औषधि मिळता तीव्र उठला वीर लक्ष्मण।
द्रोणा परतुनि नेला तोषला रघुनंदन ॥२०
राम सगुद्द होवोनि बोलले मारुतिप्रति।
उपकार जाहले थोर धन्य धन्य तुझी कृति ॥२१
पुढे युद्धांत श्रीरामा साह्य केले कपीवरें।
झोडिले मारिले केले त्रस्त रावण सैन्य ते ॥२२
तैसे अहीमही तेंहि माराया साह्य मारुती।
देवि रूपे वाचविलें रामरामानुजाप्रति ॥२३
उमाणिकु चंद्रसेनेच्या वचनीं रामगुंतला।
अपूर्व युक्ति योजोनि रामभक्त सुरार्दला ॥२४
मारिला रावणू रामें पावला जय थोर तो।
सीतेसहित आनंदे पातला स्वपुरींत तो ॥२५
येणे परि हनुमंते कृत्य केले अलौकिक।
कोण वर्णू शके पूर्ण. करिति देव कौतुक ॥२६

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

मारुती प्राण रामाचा राम तेणेच हो जयी।
रामायणीं मुख्य मूर्ती सर्वा तेणेच सौख्यही॥२८
चरित्र हनुमंताचे अगम्य अनुपम्य तें।
गाती योगी मुनी सर्व सनकादिक थोर तो॥२९
अग्रणीं सर्व भक्तांचा, ज्ञानीयां सर्व मान्य जो।
सिद्ध योगीश्वरांते ही, गुरु प्रेमळ पूज्य तो॥३०
जन्मतः कटि कासोटी सोन्याची ज्या सदा असे।
रत्नेया त्या सर्व सीता ज्यां घेर रामाचि ज्यां दिसे
कामिनी कांचनाची ज्यां लेश ना मनिवासना॥३०
कीर्तिची चाड ना चित्तीं रामावांचुनि आस ना॥३१
म्हणोनीच विरक्तीची, मूर्ति प्रत्यक्ष मारुती।
तैसीच शक्ति भक्तीची उपमा ना दिसे। क्षितीं॥३२
अनन्य दास्य पाहोनि दवला जानकीपति।
सीतेची वदला प्रेमें पूर्ण पात्राचि मारुती॥३३
निजात्मबोध दे यातें ब्रह्मचारी असे खरा।
निरपेक्ष मनी शुद्ध ऐसा ना जगीं दुसरा॥३४
बोलली मग ती सीता हनुमंता! लक्ष देई रे।
ब्रह्मात्मा राम हा सत्य। निर्विकारी। निसंग रे॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

कर्तृत्व तितुके माझें अकर्ता राम निन्मय।
आला गेला न तो लेश आकाशासम अद्वय ॥३६
रामायण रामीचां केले रामीं आरोपिति वृथा।
सूज ते जाणिति रामा राम साक्षी न अन्यथा ॥३७
रामसन्नेवरीमीही सर्व कार्य करितसे।
राम हा क्षम माझा रे मी चक्राणेश्वरी असे ॥३८
रविप्रभा एकमेकां अनन्य असती जसे।
रामसीता एकमेका अनन्य भजाति तसे ॥३९
देवगोद्विजधर्मातें रक्षाया राम भूवरीं।
मनुष्यरूप तो येई, निर्विकारेन वावरी ॥४०
सच्चिदानंद श्रीराम तयाचे तनुही तसे।
पावित्र्य माझ्यें त्याची ध्यायी चित्तीं अहर्निशी
ऐकोनी बोध हा सारा राघवी रमला मनें।
रामे आलिंगिलें त्याते तोषला बहु तो खुणे ॥४२
वदे रामा तुझी कीर्ति ऐको कान जगी सदा
मुखीं तुझे नाम राहो दुजी आस नसो कदा ॥४३

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

जेथें रामकथा तेथें हात जोडोनि राहिन ॥
ऐकेन नम्रभावें ती मागणे तुझ आन न ॥१॥
भजनी रामरायाच्या रंगे दासि निरंतर।
रामपादाब्ज तो सेवि दास होवोनि तत्पर ॥२॥
आपुल्या भक्तिनें केला रामाते आति आंकित।
हृदयीं हृदयीं जानकीनाथा अनन्यें अनुचिंतन ॥३॥
मारुती हृदयीं राम रामचिंतन मारुति।
स्वामीसेवक ते दोघे आनंदी आनंदोदयीं पोहती ॥४॥
दास तो जाहला स्वामी स्वामी तो दास जाहला।
पूर्ण ब्रह्मचारी श्रीराम, उंडरी निर्द्वंद्व नांदला ॥५॥
मारुती भक्तिला नाथ मारुती भक्ति सागर।
मारुती भक्तिचा ठाव मारुती भक्ति आगर ॥६॥
ज्ञान वैराग्य सद्भक्ति वसती मारुती पदीं।
देवता सर्व सिद्धि त्या मारुतीपादीं लोळती ॥७॥
करालकलि बाळीं या भजा हो मारुती पदा।
रामदासादि ते संत सांगती हे जना सदा ॥८॥
सुकाची वा दुकाची त्या समर्पावे वासुनंदना।
हरी तो सकळा बाधा, भेटवी रघुनंदना ॥९॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

७

मारुती कामधेनु हा पूरवी सर्व कामना।
सफल दुःखनाशोनि सुखवी संत सज्जना॥५३
दास ही तुलसीदास, पटली जन हो पहा।
वानर नर या माना रामेश्वरची हा महा॥५४
मारुते हे कृपा-सिंधो! देई भक्तिं सदा जनीं
प्रेमे राम गुणा गावो, नित्यरंगो मुक्तिनी॥५५

— ०६ —

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection



दिनाधार =

[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]

[illegible] होतो. परमात्मा या स्वरूपाचा आत्मा [illegible]
[illegible] आपले अस्तित्व [illegible] होतो. प्रकृति [illegible]
जे [illegible] आदिशक्ति एक भाग. मूलमायेला व
प्रकाशास्पद परमात्म्याला शिव शक्तिरूप मानले
आहे. ही शक्ति शक्ता हून भिन्न नव्हे. [illegible] परधीन
राहते. हि प्राणिमात्रा वरोवर च परमात्मस्वरूपा-
प्राप्ति [illegible] निर्विज्ञान स्वरूप होतो. ज्ञानरूपा-
र्थी, ज्ञान पदाचा अर्थ, अनुभवाच्या दृष्टीने कामुख्य
[illegible] व [illegible] अभ्यासा समर्थनी दासनो-
धीन सांगितला आहे. दशक १३ समाप्त ॥
पीतांबर ज्ञान्यें अगदीं स्पष्ट विवेचन आहे.
एक गोष्ट लक्षांत घ्यावी की — दासबोधांत
अपला ॥ हा शब्द समर्थनी अनेक अर्थी
वापरला आहे. ग्रन्थकारानें प्रसंगानुरोधानें
अर्थ बदलवा. व आणीं ज्ञाता —

आधीं आत्मानात्म विवेक थोर ॥
मग सदासदाद विचार थोर ॥
सदासार विचारें संहार ॥ प्रकृतीचा ॥ १
विचारें प्रकृति संहारे ॥ दृश्य अस्तांत बोसरे ॥
अंतरात्मा निर्गुणीं संचरे ॥ अध्यात्म श्रवणें ॥ २

पदाचा अर्थ लागला ॥ तरी अंतरात्मा चटलाचि
गेला ॥

अंतरात्मा अर्थ अंतःकरण ॥ मूर्मंडळीं
अर्थ सारासार आत्मा होतो ॥ जिकडे नेतो
तिकडे जातो ॥ अनुमानें संदेहीं पडतो ॥
कांहीं येक ॥ ४ ॥

निसंदेह अर्थ - पालटला ॥ तरी आत्मा निसंदेह स्वये
आहेला ॥ अनुमान अर्थ जाहला ॥ अनुमान स्वभावें ॥
या कारणें सर्व सांडावें ॥ येक देवास धुंडावें ॥ ५
तरीच वर्म पडे ठावें ॥ कांहीं येक ॥ ६

तरीच ओळखा वस्तु स्वरूप दिसतें कां अभ्यासी पुरुषाचें
पदाचा - मूळ अर्थ ध्यावा. त्यांचून आत्मा मुख्य वस्तु
प्राप्त होणार नाहीं. ज्ञान साक्षात्कार या मार्गांनीच
आहे. निर्गुणोपासनेनें निरंजन स्वरूपाचा साक्षात्कार
करून घ्यावा. हेच ज्ञान सांगितलें आहे.

ज्ञानं आणि अभ्यासना ॥ दोनी अेकाचि भावना ॥
मा ज्ञानाचें विज्ञान होतें ॥ हेंचि न पडे
बहुमतें ॥ रामदास.

ज्ञान व अभ्यासना कोणत्या अर्थानें एक आहेत हें आतां लक्षां-
त येईल. ज्ञानाचें विज्ञान होतें म्हणजे अपरोक्ष साक्षात्कार
होतो. शाब्दिक ज्ञानी पुस्तकांत सांगितलेला ब्रह्मज्ञान
व मिथ्या निश्चय हे दोन्ही कल्पनामय काल्पनिक असल्यानें
संतांना मुमुक्षूंना विज्ञान दशा प्राप्त करून घ्यावयाची

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

होती हृदयून त्यांनीं अुपानिषद् ज्ञानाचीं ज्ञानिनिर्गुणा
परब्रह्मा सांगून साक्षात्कार करून ध्यान, व स्वात्मज्ञ-
ज्ञप्ति व अखें सांगितलें. हीच पुरुषार्थ - आत्म-
~~ज्ञान~~ निवेदन आणि त्यांनीं सांगितली आहे —

जाणतां जाणतां जाणीव जाणे ॥ आपुली वृत्ति
तद्रूप होणे ॥ आत्मनिवेदन भक्ति ते ॥ ऐसी
आहे ॥ रामदास

परमात्मध्यान धरतां धरतां जाणीव कळासमूळ
जाते व दोघांची सूक्ष्म वृत्ति लीन होते हृदयून ही भक्ति ज्याने
केली तो धन्य धन्य —

हृदयीं ज्ञाता धन्य धन्य ॥ जो निर्गुणेंसी
अनन्य ॥ आत्मनिवेदनें मान्य ॥ परम पुरु-
ष ॥ रामदास.

प्रकाश व नाद यांचें ऐक्य

प्रकाशरूप परमात्म्याचा साक्षात्कार होणें हणजे परब्रह्मस्वरूपाचे सगुणस्वरूपाचा साक्षात्कार होणें आहे. प्रकाशरूप हें च निर्गुण निराकार, निरालंब असा अगम्य स्वरूपाचें सगुणरूप होय. हें तर साधुपुरुषांनीं आत्मप्रत्यावस्तुकर्मे अुघड सांगितलें आहे हें एथवर दाखविलें. परंतु च ज्ञानियांचें स्वरूपीं परमेश्वराचें स्वरें नामस्मरण हणजे नादब्रह्मा-चा साक्षात्कार होणें हे होय. आणि अनुहात ध्वनि

अुत्पन्न होऊन त्याचा अनुसंधान राखणें हे
अखंड नामस्मरण व ध्यानें च परब्रह्मस्वरूप
प्राप्ति होते हें सांगून, अमृत वाणीनें दाखविलें
तें. अतींद्रिय ज्ञानानें कानांत अनाहत ध्वनी अुत्प-
न्न होतो व नादब्रह्मा किंवा प्रकाशरूप परमा-
त्म्याचा साक्षात्कार होणें हा दोन्ही अवस्था आति-
अुच्च व समान योग्यतेच्या आहेत. संतांच्या
आकलनेच्या या देवमान रूपाचीं हीं अखंड अुपासनें
किंवा अखंड चिंतनें आहेत. किंवा हीं परिणामाप्रति स्थानें
आहेत. या दोंकीं एकत्रेच व दुसरें कनिष्ठ असें मानूं नये.
साधक दशेमध्यें याने ज्या वीणीने अभ्यास केला असेल
किंवा ज्या गुरूनें ज्या पद्धतीनें त्याच्या कडून अभ्या-
स करवून घेतला असेल त्याप्रमाणें त्या अंगाकडे
प्रकाशरूपाची किंवा नादाची प्रतीति येईल. ध्यान-
धारणादि मनोलयाच्या अभ्यासाकडे प्रथम प्रकाशरूपा-
चा साक्षात्कार होईल तर इष्ट योगाचा किंवा कोणी
मुद्रांचा किंवा मनोलयाचाहि अभ्यास करणारास
प्रथम नादाकडे मेंदू लागतील. असा सर्वसाधारण
नियम असला तरी परब्रह्माच्या सगुणस्वरूपाचें
दर्शन साधकास प्रकाशरूप किंवा नादरूप या दोंकीं
कोणत्या स्वरूपांत प्रथम होईल हें नियमानें कोणीं
सांगूं शकत नाहीं. कोणताहि स्वरूपांत दर्शन झालें
तरी दोन्ही स्वरूपांत तीं करून दर्शन स्वाधीनें होतें.

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रीपद्मेश्वर-श्रीपामरी आहे. परंतु हा अर्थ
अवस्था नाहीं. कारण या अवस्थेचें लक्ष्य अगाध
अगोचर अशा परब्रह्मस्वरूपांत होतो. येथें
स्वरें कीं प्रकाश व नाद यांचा अन्योन्य संबंध आहे
म्हणजे एकाची वृद्धि झाली होतांच दुसऱ्याची वृद्धि
होते. आणि अखेर होतें अगदीं साहजिक आहे. कारण
सहस्रदल कमलामध्यें व दोघांचा अगम आहे. हें
मागील संतवचनांवरून ध्यानांत घ्यावें. ध्यानावस्थे
मध्यें मस्तकांत मध्य भेदूनाहि कांहीं प्रकाश किंवा
नाद यांचें स्फुरण होत असतां त्याचा अनुभव साधकास
येत असतांच जागवत असेल तर हा अल्प सती-
तीचा व ओढा स्वरूप विषय आहे. नाद म्हणजे प्रकाश-
रूप हीं एकच आहेत, एकरूपच आहेत —

नाद ज्योति परिपूर्ण आत्मा ॥
परेसी पहाता अजन्मा ॥

ज्ञानेश्वर.

परमेश्वराचा स्वतःचा सगुण रूपाचें स्वरें नामस्मरण करा-
वें. म्हणजे आपल्या नामाचीं पूर्ण दुसरा श्रेष्ठ मंत्र कोणता असणार

नाम तेंचि रूप, रूप तेंचि नाम ॥
नामरूपा भिन्न नाहीं नाहीं ॥
आकारला देव नामरूपा आला ॥ सुणोनी स्वाधिलें नाम
देहीं ॥ नामा परता मंत्र नाहीं हो आणीक ॥ सांगतो
तुम्हा ज्ञानहीन ॥ नामदेव

साधुसंत अवस्थेंत परब्रह्माचे ठायीं
तन्मय तदाकार होत असतां आनंद किंवा
तद्रूपें अपरोक्षीण असतां आनंदसागरांत डोळे
मीटोनें म्हणजे आनंद लहरींत करावें लागतो. व
म्हणजे आनंदाचा अनुभव घेत होतो म्हणजे वर्णन
करणें मोठ्या नवलाचें करणें ठेवलें आहे. या
आनंदोत्सव अवस्थेंत परब्रह्मपाने म्हणजे मुखांतून
अनेक वचनामृतें बाहेर पडतीं आहेत. हीं पदें अगोचर
वाणी मुखरूपा राहिल्याने हि आनंद होतो व मग
परब्रह्मपाचा जें अनुभव घेत असतांच म्हणजे आनंद
लहरींचा अनुभवि कांहीं कल्पनाच करावी.
अशा वचनांत कीं —

आनंदु बोलतां नाहीं नातुडे ॥ श्रवणीं ऐकतां
बोलतांचि बुडे ॥ डोळा पाहतां अगाध पडे ॥ अनु-
भव चिंतितां मनाचे बुडे ॥ एकनाथ

तीहीं श्रीहरी ऐसें नाम घेतां ॥ वाचा धरितां
तरी ही नमनीं पाहीना ॥ ध्यानीं मनीं ध्यातां
जेथें नेथें ॥ नामदेव

साधुकवडूं दरा चिंतिला अंतरीं स्वरूप पाहावयालागीं
नामस्मरणाचा वटमार्गे म्हणजें मंत्रावलि पाठ करून आनंद
दाचा अनुभव घेतात —

सनांगितलें गुज ॥ पाहावयालें निज ॥ पाहतां
हो तुज ॥ काय चाड ॥

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

रनेश्वर हणे नामयातें ॥ अवघ्याचि देव ॥

महेश्वर

या अभंगाचे शानीतर नामदेवाची हाताची मिश्रणि-

पहा —

दृष्टीचें देखणें श्रवणीचें ऐकणें ॥

मनाचें बैसणें अेक होय ॥

नामा हणे परी विठोबा येऊनि भेटे ॥

काया पालटे कैवल्य होय ॥

नामदेव

नाथ महाराज हणतात —

नाम रूप नाहीं भेद ॥ नुरला वादे-वाद

गोविंद ॥ अेका जनार्दनीं छंद ॥

बोला माजीं परमानंद ॥

एकनाथ

असे वाटतें हे अभंग एकाग्रतेने ध्यान योगाने

किंवा नामानुसंधानाने होतात तर प्राप्त करण

येतें येतो हें जरी खरें आहे तरी नामानुसंधाना-

ने होणारा लय श्रेष्ठ मानला आहे कारण — नाद

हा वायुस्वरूप आहे हें ब्रह्माचें मूळ स्फुरण आहे

हणून वायूचा लय गगनस्वरूप होणें क्रम-

प्राप्त आहे. तसेच शब्द हा आकाशाचा गुण आहे

हणून तो तेथें लीन होणें हें प्रशस्त

आहे. मागिल्यापेक्षां दुसरें अभंगात असें की —

स्वरूप साक्षात्कार होऊन पूर्णब्रह्म आजची

प्राप्त झाली तरी देह असे पर्यंत देह प्रारब्ध

भोगल्या शिवाय स्वरूपाचा अनुभव. म्हणजे

सहजावस्था प्राप्त होते. व या अवस्थेत नामानुसं-

धान व स्थिर असतें (कायम टिकतें) देहप्रार-

ब्धभोगावयाचें राहिलें की शेवटची अवस्था

सोडून पूर्वावस्थेत यावयास पाहिजे. म्हणजे

ब्रह्मकार्य व मायाकार्य हीं दोन्हीही सुटून केवळ योगाने

व इच्छेने वृत्ति चटकन अंतर्मुख किंवा बाह्यमुख करतां

येते. अशा स्थितींत नामानुसंधानापेक्षां नामानुसं-

धान सहज होऊं शकतें हणून नामानुसंधानाला श्रेष्ठ-

म्हटलें आहे. तसेच नामाचें महत्व अगाध आहे —

वेगू नाम्याचिया किर्ती ॥ पान्हा फुटला

मिराशी ॥ एकनाथ

माझें मनुष्य जन्म जावो येथें डोळां ॥

पिंपळी प्रेमाचा नामसुद्रा ॥

अखंड निरंतर येणें अनुसंधानें ॥

प्रारब्ध भोगणें गोड वाटे ॥

नामदेव

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

चक्रभेदन

मूळ वायु मूलाधार-चक्रावरून निघून दुसऱ्या
क्षणजे स्वाधिष्ठान-चक्रावर आल्यावर त्याचे दोन
भेद होतात. एक प्राण व दुसरा अपान. प्राण ऊर्ध्व
वाही आहे. अपानाची गती अधोमुख आहे. स्वाधि-
ष्ठान-चक्रावर अपानाची गती ऊर्ध्वमुख करावयास पाहिजे
ती गती करतां आली म्हणजे अपान ऊर्ध्वगत होऊन तो
मणिपूर-चक्रावर किंवा नाभिकमलामध्यें प्राणवायूशीं
लीन होण्यास मेळतो. नाभिकमलाचें महत्व फार आहे.
हें कमल देवीचे समान रेखेंत १४ उडू-पे फुटले
अंगास असल्यामुळें त्यास नाभिकमल म्हणतात. याठि-
काणीं इडा व पिंगळा नाड्या येऊन मिळतात. येथून
सुषुम्ना मार्ग ऊर्ध्वगतीनें सुरू होतो. कुंडलि-
नीचांचाची प्राणशक्ति येथें नाश करते. प्राण व अपान
यांच्या संयोग येथें झाला किंवा अपान प्राणांत लीन
झाला म्हणजे तो सुषुम्ना मार्गांत शिरूं पाहतो. चक्र
किंवा परमंतरी मनोत्पत्ति दृढ अभ्यासा-
नें ह्या कुंडलिनी नामक शक्तीस चालना मिळते व प्राण
सुषुम्ना पंथांत शिरूं लागतो. परा किंवा निरंजन
परमंतरि चक्रें तीन अखंड नामक मरणानें, ध्यानानें
किंवा गुरूपदिष्ट कोणत्याही मार्गानें, ही कुंडलिनी जागृत
होते. ह्या वेळीं अनेक प्रकारचे अनुभव येऊं लागतात.
ही प्राणरूप कुंडलिनीशक्ति नाभि-चक्र भेदन करून वर अना-
हत-चक्राकडे किंवा हृदयकमलाकडे जाऊं लागली

म्हणजे तिला प्रकाशरूप प्राप्त होतें. तीज
शक्ति आहे. तीस्वाय वाविलों येत नाहीं. पण ज्या
वेळीं ती पीडीष्ट मार्गानें जाऊं लागते. वेळां
वर्णनानें प्रकाशीत होते व हृदयांवर होते त्या
प्रसंगी ही कुंडलिनी मात्र प्रकाश जळा-
सारखी निर्मळ असें वाटूं लागते.

जैसी हृदयकमळ वेळीं ॥
जैसी दिसे सोदामिनी सरी ॥
नातरी प्रकाश जळाची झरी ॥
वाहत आली ॥ ज्ञानेश्वर

ज्ञानेश्वरी आलंकारिक ओवीतील ज्ञानेश्वर सर्व शरीरां-
तील प्राणशक्ति एकवट होऊन ती पीडीष्ट मार्गानें वाहूं
लागते. त्या वेळीं शारीरिक इंद्रियांचे धर्म व बहुतेक सर्व स्फुरण
बंद पडतें असा अनुभव येतो. अनाहत हें चौथें चक्र
आहे. येथें मनाचें वास्तव्य आहे. येथें प्राण आल्यावर
मन व प्राण एकरूप होतात. एक दुसऱ्यांत लीन होतो.
या अनाहत-चक्राचें भेदन केलें म्हणजे वायूचें स्फुर-
ण होऊं लागतें. ध्वनि व नाद यांची कांहीं नांदीचें
स्फुरण सुरू होतें. हृदयाचे ठिकाणचें चिदाकाश
हें महत्काकाशांत लीन होऊं लागतें. या योगें प्रकाश व
नाद स्वरूप पांच प्राणवायूची ऊर्ध्वगती पुढें कंठस्था-
नी तीन जोंधळ्या विशुद्ध-चक्रावरून आज्ञा किंवा
अग्नि-चक्रास भेदित-पाशू आवरते. या ठिकाणचा

CC-0. In Public Domain.Kavikulguru Kalidas Sanskrit University Ramtek Collection

श्रेष्ठनीलरूप अनुभव प्रकाशरूपांत येतात.
किंवा क्रमवार अनुहत ध्वनीरूपांत - नाद
रूपांत येतात. अग्नि-प्रकाश - धूम्ररूपांत
आत्म्याचें दर्शन होतें व त्याचे ज्ञानानें पुढील
मार्ग आक्रमण करतां येतो. अशा प्रकारानंतर कुंड-
लिनी शक्ति ब्रह्मरंध्रांत म्हणजे सहस्रदल कमलांत
प्रवेश करते. या भागांत ब्रह्मांडाच्या चारी देशांचे
अनुभव - सूर्य, चंद्र, अग्नि मंडळादिकांच्या दर्शना-
चे अनुभव येतात. परमात्म्याच्या अंगुष्ठमात्र आत्मा
ते जो देह विलीन होऊन त्यास वायुचें स्वरूप येतें
हा हंस पक्षी असून तो महदाकाशांत विहार करतो
असें हिरण्यक ऋषिचे म्हणतात. शेवटीं तो परमात्मा
शांतब्रह्मांत लीन होतो. पिंडाकाश व महदाकाश असा भेद
राहात नाहीं. तो सर्वत्र प्रकाश एकरूपानें भरून राहिला
दिसतो. याच वाटीचें कुंडलिनी हें नांव घेऊन प्रकरण-
रूप मारुत - नादपुरुष - अग्नी विद्या संज्ञा प्राप्त होते
इच्छा शक्तिरूप पुढें नीरोधरूपाप्रमाणें आदिपर्यंत म्हण-
जे परब्रह्मस्वरूपीं लीन होईपर्यंत राहातें.

ते वेळीं कुंडलिनी ही आप जाये ॥
मारुत ऐसें नाम होये ॥
परी शक्तिपण ते आहे ॥
जव न मिळे हरीचें ॥

ज्ञानेश्वर

चंद्राच्या शरीरावर षोडश कला असतात.
कारण चंद्राचें कलावाढीत असें स्वरूप
नें असतें. त्यास सत्रावी कला म्हणतात. त्यामुळें
पिंड ब्रह्मांडाच्या निरासानंतर आत्मस्वरूप साक्षित्व
नें असतें. तो च प्रकाशरूप परमात्मा हीच सत्रावी
कला अवस्थेत असे गेल्यावर कुंडलिनी सत्रावीचें अमृत
